# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# प्रेयसी या छायाचित्र प्रदर्शनातून कलावंताचे वेगळेपण प्रकट : गुरु ठाकूर

## सुप्रसिद्ध छायाचित्रकार कशाळीकर यांच्या छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन

**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

कलावंत आणि सामान्य माणसात फरक असतो, यातील कलावंताचे वेगळेपण प्रसिद्ध छायाचित्रकार देवदत्त कशाळीकर यांच्या प्रेयसी या छायाचित्र प्रदर्शनातून पाहायला मिळते असे प्रतिपादन सुप्रसिद्ध गीतकार, कवी गुरु ठाकूर यांनी केले. देवदत्त कशाळीकर यांच्या प्रेयसी या छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन सोमवारी (दि.१२) ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी सुप्रसिद्ध कला दिग्दर्शक महेश कुडाळकर, कलारंग प्रतिष्ठानचे अध्यक्ष अमित गोरखे, सहाय्यक आयुक्त अण्णा बोदडे, महानगरपालिकेतील निवृत्त अधिकारी प्रवीण तुपे, सकाळ समूह संपादक सम्राट फडणीस, ज्येष्ठ पत्रकार जयंत जाधव, विवेक इनामदार, विश्वास मोरे, गोविंद वाकडे, नाझीम मुल्ला, कैलास पुरी, मिलिंद भुजबळ आयोजक देवदत्त आणि वर्षा कशाळीकर आदी उपस्थित होते. बुधवार (दि.१४ फेब्रुवारी) पर्यंत सकाळी दहा ते रात्री नऊ वाजेपर्यंत हे प्रदर्शन सर्व कला रसिकांना विनामूल्य पाहण्यास मिळणार आहे.

गुरु ठाकूर म्हणाले की, उत्कृष्ट कलाकृती पाहिल्यावर दुसऱ्याला काहीतरी करण्याची प्रेरणा देते अशा सर्वोत्तम फोटोचे प्रदर्शन प्रेयसी हे सर्वांनी आवर्जून पाहिले पाहिजे. मी या फोटोंना कविता दिल्या



आहेत, त्याचे खरे श्रेय हे देवदत्त मध्ये असलेल्या कलाकाराचे आहे. प्रत्येकाने आपल्या हृदयातील नाजूक कप्प्यात प्रेयसीची आवडती प्रतिमा चिरंतन जपलेली असते. ती त्यांच्या कल्पनेतून आणि कॅमेरातून टिपली आहे. ही प्रेयसी आणि निसर्ग यांचं नातं छायाचित्र प्रदर्शनातून कला रसिकांना मंत्रमुग्ध करणारी आहे. चेहऱ्याच्या पलीकडे जाऊन पण सौंदर्य आणि सृजनतेची एक परिभाषा असते. अशी मनाला भुरळ घालणारी छायाचित्रे आपल्या हृदयाशी संवाद साधतात अशा शब्दात ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. सम्राट फडणीस यांनी शुभेच्छा देताना सांगितले की, हे प्रदर्शन महाराष्ट्रातील सर्व शहरांमध्ये झाले पाहिजे. 'प्रेयसी' या संकल्पनेला मूर्त रूप देण्यासाठी देवदत्त कशाळीकर यांनी महाराष्ट्र, लडाख, कर्नाटक, गोवा, गुजरात, उत्तर प्रदेशात जाऊन थंडी, ऊन, वारा, पाऊस अगांवर झेलत छायाचित्रे टिपली आहेत. स्पेशल आरकईव्ह अशा कॅनव्हास वर सप्तरंगाची मुक्त उधळण करीत अतिशय सुंदर कलाविष्कार असणारी ६० पेक्षा जास्त छायाचित्र या प्रदर्शनात आहेत. प्रवीण तुपे, अमित गोरखे यांनीही शुभेच्छा दिल्या.या प्रदर्शनास भेट देणाऱ्या कला रसिकांनी ड्रॉप बॉक्स मध्ये आपल्या आवडत्या फोटो फ्रेमचा क्रमांक द्यावा. एकूण ड्रॉप बॉक्स मधील तीन भाग्यवान रसिकांना या प्रदर्शनातील मूळ फ्रेम १४ फेब्रुवारीला व्हॅलेंटाईन डे च्या दिवशी प्रदर्शन स्थळी रात्री नऊ वाजता भेट देण्यात येईल अशी माहिती वर्षा कशाळीकर यांनी दिली. प्रास्ताविक देवदत्त कशाळीकर, सूत्र संचालन अमृता प्रकाश तर आभार वर्षा कशाळीकर यांनी मानले. देवदत्त कशाळीकर यांना भारत सरकार चा युवक कल्याण मंत्रालयचा पुरस्कार आणि महाराष्ट्र शासनाचा प्रथम पुरस्कार प्राप्त पुणे जिल्ह्यातील फोटोग्राफर आहे. तसेच निकॉन पुरस्कार, कॅनन पुरस्कार, जगदीश खेबूडकर पुरस्कार, मोरया पुरस्कार, टाइम्स ऑफ इंडिया पुरस्कार, वसुंधरा फिल्म पुरस्कार असे अनेक पुरस्कार मिळाले.

# जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ बुधवारी भव्य रॅलीचे आयोजन

## बुधवारी सकल मराठा समाजाकडून महाराष्ट्र बंदची हाक

**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

मराठा समाजाच्या आरक्षणासह विविध मागण्यांच्या साठी मनोज जरांगे पाटील विविध आंदोलने करत आहेत. जानेवारीत आपल्या लाखो सहकाऱ्यांसह जरांगे पाटील मुंबईत धडकले. तेव्हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्र सरकारच्या वतीने जवळपास सर्वच मागण्या मान्य केल्या. त्यांच्या हस्ते मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतले व आंदोलन स्थगित केले. सगेसोयरे यांना जात दाखले देण्याचा अध्यादेश काढला. त्याचे कायद्यात रूपांतर व्हावे तसेच अंतरवली सराटीसह महाराष्ट्रातील विविध ठिकाणी आरक्षण आंदोलकांवर दाखल केलेले गुन्हे मागे घ्यावेत सरकारने मराठा समाजास दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करावी. राज्य विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलवावे यासाठी मनोज जरांगे पाटील गेल्या तीन दिवसांपासून आमरण उपोषण करत आहेत. त्यांना समर्थन देण्यासाठी सकल मराठा समाजाकडून बुधवार दिनांक १४ रोजी महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे.या बंदला मराठा क्रांती मोर्चा व सकल मराठा समाज पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने पाठिंबा दिला आहे. तसेच बुधवारी शहर बंद ठेवून शांततेत पाठिंबा देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी बुधवार दिनांक १४ रोजी सकल मराठा समाज पिंपरी चिंचवड शहर व मावळ तालुक्याच्या वतीने भव्य दुचाकी व चार चाकी रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. सदर रॅलीची सुरवात बुधवार सकाळी नऊ वाजता डांगे चौक थेरगाव येथील छत्रपती शिवाजीमहाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून करण्यात येणार आहे. सदर रॅली तेथून पुढे काळेवाडी फाटा, जगताप डेअरी, रहाटणी, पिंपरीगाव मार्गे डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, पिंपरी येथे जाणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा जोतिराव फुले यांच्या पुतळ्यास अभिवादन करून सदर रॅली चिंचवड स्टेशन, आकुर्डी, भक्ती शक्ती समूह शिल्प निगडी कडे जाणार आहे. सदर रॅली तळेगाव मार्गे वडगाव कडे रवाना होणार आहे. छत्रपती संभाजी महाराज चौक वडगाव मावळ येथे रॅलीचा समारोप होणार आहे. सदर रॅलीचे नियोजन सतिश काळे, सचिन बारणे, प्रकाश जाधव, भाऊ ढोरे, वैभव जाधव, नरेंद्र मुर्हे, अमोल ढोरे, नकुल भोईर, रावसाहेब गंगाधरे, विशाल मुर्हे, गणेश देवराम, संतोष शिंदे, सागर चिंचवडे, अरुण पवार, लहू लांडगे, शिवाजी पाडुळे, पोपट काळभोर, मारुती भापकर, सुनिता शिंदे, सचिन काळभोर आदी कार्यकर्ते करत आहेत.

# मोशी परिसरात भटक्या कुत्र्यांची दहशत

## ज्येष्ठ नागरिक, लहान मलांचा जीव धोक्यात;त्वरीत कारवाईची मागणी

**मोशी**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
जोरजोरात भुंकणे आणि परिसरातून जाताना गुरगुरणाऱ्या श्वानांची मोशी परिसरात दहशत निर्माण झाली आहे. त्यामुळे नागरिकांना जीव मुठीत घेऊन रात्री अपरात्री रस्त्याने जावे लागत आहे. श्वानांचा कोणत्या क्षणी हल्ला होईल, हे सांगता येत नसल्यामुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण आहे. या भटक्या कुत्र्यांचा वेळीच बंदोबस्त करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते निलेश बोराटे आणि ग्रामस्थांनी केली आहे. सध्या मोशीचा परिसर उच्चभ्रू वसाहतींचा अविभाज्य घटक बनत चालला आहे. रात्री नऊ ते दहाच्या समारास फेरफटका मारण्यासाठी नागरिक घराबाहेर पडतात. त्यांना अशा भटक्या श्वानांचा सामना करावा लागत आहे. गंधर्वएक्सलंस सोसायटीमध्ये कुत्र्याने एकाचा चावा घेतल्याने भितीचे वातावरण आहे. गायकवाड वस्ती, नागेश्वरनगर तसेच परिसरात आजुबाजूच्या कुत्र्यांची झुंड असते.दुचाकी, चारचाकी रस्त्यावरून जाताना गाडीच्या मागे कुत्री धावतात. दुचाकी वाल्यांचे यामुळे किरकोळ अपघातही झाले आहेत. त्यामुळे त्वरीत महापालिका प्रशासनाने कुत्र्यांचा बंदोबस्त करावा.



> “रस्त्याच्या कडेला कुत्री रात्रीच्या वेळी दबा धरून असतात, दुचाकी चारचाकी गाड्या आल्या की, त्यांच्या मागे भूंकत पळ काढतात. चालक घाबरलेले असतात. अनेकवेळा दुचाकीवाल्यांचे किरकोळ अपघात झाले आहेत. त्यामुळे महापालिका प्रशासनाने लक्ष घालून भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा.
>
> **-निलेश बोराटे, सामाजिक कार्यकर्ते**



> “कुत्र्यांची संख्या कमी करण्यासाठी नवीन योजनेनुसार वर्षभरात चार हजार कुत्र्यांची नसबंदी केली आहे. अजून प्रमाण वाढवले जाईल. कुत्र्यांचा उपद्रव सुरु असेल त्यांनी लेखी स्वरूपात माहिती आणि पत्ता पाठवावा कारवाई करण्यास पथक येईल.
>
> **- डॉ. अरूण दगडे, पशुवैद्यकीय अधिकारी महापालिका**



> “महापालिकेचे पथक दिवसा कुत्र्यांवर कारवाई करण्यासाठी येते. मात्र कुत्री रात्रीच्या वेळी झुंडीने रस्त्याच्या कडेला असतात. महापालिका प्रशासनाने रात्रीच्या वेळी कारवाईवर भर दिल्यास नक्कीच कुत्र्यांचा उपद्रव कमी होण्यास मदत होईल.
>
> **- अश्विनी जाधव, माजी नगरसेविका**

# वृक्षतोडीच्या निषेधार्थ पर्यावरणप्रेमींचे मुंडन आंदोलन

## इको पार्कची जागा ही बनावट पंचनामा करून हस्तांतरित करण्यात आली

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
रावेत येथील इको पार्कची जागा ही बनावट पंचनामा करून हस्तांतरित करण्यात आली. या ठिकाणी निवडणूक आयोग अनधिकृत बांधकाम करत असल्याचा आरोप करत त्यासाठी वृक्षतोड केल्याच्या निषेधार्थ पर्यावरणप्रेमींनी मुंडन आंदोलन केले. रावेतमधील इको पार्क गेल्या काही महिन्यांपासून बंद करण्यात आले आहे. याकडे महापालिका, पोलीस आणि जिल्हाधिकारी कार्यालय जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत. पाण्याअभावी झाडे मारली जात आहेत, तेथील जैवविविधता नष्ट करण्यात येत आहेत.ही झाडे जगविण्यासाठी पर्यावरणप्रेमी सरसावले असून, इको पार्क सर्वांसाठी खुला करावा, अशी मागणी त्यांनी केली होती. मात्र, हे पार्क खुले न केल्याने प्रशासनाच्या निषेधार्थ मुंडन आंदोलन करण्यात आले. गेल्या काही दिवसांपासून इको पार्कमधील झाडे पाण्याअभावी सुकत आहेत. डिसेंबरमध्ये पर्यावरणप्रेमींनी उद्यान विभागाकडे सर्वेक्षण करण्याची मागणी केली होती. त्यात सुमारे १४० दुर्मिळ झाडे सुकल्याचा अहवाल देण्यात आला होता. त्यामुळे पर्यावरणप्रेमींनी झाडे वाचविण्यासाठी स्वखर्चाने टँकरने पाणी सोडले. तसेच झाडांना पाणी मिळावे, ती जगावीत यासाठी हे पार्क खुले करण्याच्या मागणीसाठी आंदोलन करण्यात येत असल्याची माहिती पर्यावरणप्रेमी प्रशांत राऊळ यांनी दिली.



# विकास होण्यासाठी महापालिका आवश्यक

## पुणे जिल्ह्यातील तिसऱ्या पालिकेबाबत अजित पवार यांची घोषणा

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
शहरानजीकच्या गावात बेकायदेशीर बांधकामे, रस्त्यांचे प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे व्यवस्थित विकास होण्यासाठी महानगरपालिका, नगरपालिका असणे आवश्यक असून देहू, आळंदी, चाकण, राजगुरूनगर मिळून एक महानगरपालिका करता येईल का याबाबत विचार सुरू आहे, असे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार म्हणाले. अजित पवार यांच्या हस्ते लोहगाव येथे लोहगाव- वाघोली समान पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन, धानोरी सर्वे नं. ७ येथे बांधण्यात येणाऱ्या पाण्याच्या टाकीचे भूमिपूजन झाले. त्यावेळी ते बोलत होते. आमदार सुनील टिंगरे, चेतन तुपे, माजी आमदार रामभाऊ मोझे,



मनपा आयुक्त विक्रमकुमार, अतिरिक्त आयुक्त रवींद्र बिनवडे या वेळी उपस्थित होते.लोहगावच्या समस्या सोडविण्यासाठी आवश्यक प्रयत्न करण्यात येतील. संरक्षण विभागाच्या हद्दीत असलेला रस्ता बाहेरून काढून घेतल्यास येथील विमानतळाचे विस्तारीकरण करून मोठी आंतरराष्ट्रीय विमाने उतरू शकतील. कोणत्याही विकास प्रकल्पांना जागा आवश्यक असते. जागेच्या मूल्यांकनाबाबत काही अडचणी असल्यास नोंदणी विभागाशी बोलून मार्ग काढण्यात येईल, असे अजित पवार यांनी स्पष्ट केले. पाण्याच्या समस्येबाबत अजित पवार म्हणाले, की पुण्याची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरात रोजगाराच्या शोधात लोक येतात. त्यांना पाणी, आरोग्य, निवारा आदी सुविधा पुरवाव्या लागतात. त्यामुळे इंदापूर, हवेली, दौंड, पुरंदर तालुक्यातील शेतीला पाणी कमी पडत आहे. पाणी बचत व्हावी म्हणून कालव्याऐवजी बोगदा करण्याचे नियोजन आहे. पुण्याच्या पाण्यासह, शेतीला पाणी मिळावे म्हणून टाटाच्या धरणातून पाणी मिळावे यासाठी प्रयत्न सुरू आहेत. वापरलेले सांडपाणी प्रक्रिया करून शेतीला देण्यायोग्य करण्यासाठी आवश्यक तेथे एसटीपी उभारण्यात येतील.नागरिकांना सुविधा देण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीत भरीव वाढ केली आहे. लोहगाव येथील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी पीएमपीएमएलची बीआरटी लेन बंद केली. तसेच कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून उड्डाणपुलाची आवश्यकता आहे. रिंग रोड झाल्यानंतर हा प्रश्न बऱ्याच प्रमाणात सुटेल, असेही अजित पवार यांनी सांगितले. राज्य शासन नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करत आहे. राज्यात नोकरभरती मोठ्या प्रमाणात सुरू केली आहे. त्यासोबतच ठिकठिकाणी रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून विविध आस्थापनांमध्ये युवांना रोजगार मिळावा म्हणून प्रयत्न सुरू आहेत. राज्यात नवीन युवा धोरण बनविण्यात येणार आहे. आयटीआय मध्ये रोजगारक्षम नवीन अभ्यासक्रम सुरू केले आहेत, त्याचा युवकांना फायदा होईल, असे अजित पवार म्हणाले.राज्यातील महत्त्वाच्या प्रकल्पांना गती देण्यासाठी प्रकल्प संनियंत्रण समिती केली असून त्या माध्यमातून मेट्रो, रिंग रोड, मोठी रुग्णालये, बंदरे, समुद्र किनारी मार्ग आदी विविध विषयांच्या प्रकल्पांचा आढावा देऊन त्यांना गती दिली जात आहे. राज्यभरात टिकाऊ रस्ते व्हावेत म्हणून ते डांबरी ऐवजी काँक्रिटचे करण्याचे प्रयत्न आहेत, अशी माहिती अजित पवार यांनी दिली.आमदार सुनील टिंगरे म्हणाले, उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या माध्यमातून विविध विकासकामांना निधी मिळत आहे.


लोहगाव – वाघोली समान पाणीपुरवठा योजनेसाठी २३० कोटी रुपये मंजूर असून एकूण ४५० कि.मी. च्या वितरण नलिकांपैकी २३० कि.मी. नलिका फक्त लोहगावमध्येच आहेत. २० लक्ष हून अधिक क्षमतेच्या ८ टाक्या येथे असून नवीन ९ टाक्यांची कामे सुरू होत आहेत. लोहगाव उपजिल्हा रुग्णालयचे काम अंतिम टप्प्यात असून लोहगाव आयटीआय साठी निधी मंजूर आहे.

# नदीपात्रात घोंघावणारे कीटक नेमके कोणते?

## पालिकेकडे माहितीच नाही; आरोग्य विभागाला नमुने घेण्याचाही विसर

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
नदीपात्रात डासांसारख्या कीटकांचे थवे मोठ्या संख्येने दिसून आले होते. याचे व्हिडीओही समाजमाध्यमांत पसरले होते. हे कीटक डास नसावेत, असा अंदाज कीटकशास्त्रज्ञांकडून व्यक्त होत आहे. त्यामुळे नेमके हे कीटक कोणते, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

एवढ्या मोठ्या प्रमाणात कीटकांचे थवे दिसूनही महापालिकेने त्यांचे नमुने गोळा केले नाहीत. त्यामुळे



महापालिका नागरिकांच्या आरोग्याबाबत किती गांभीर्याने पावले उचलते ही बाबही समोर आली आहे. केशवनगर आणि खराडी गावठाण भागात नदीपात्रात कीटकांचे थवे दिसून आले होते. अनेक नागरिकांनी याचे व्हिडीओ काढून समाजमाध्यमांवर टाकले होते. नदीपात्रात पाण्याची पातळी वाढल्याने हे डासांचे थवे, असे उडत असल्याचे सांगितले जात होते. प्रत्यक्षात हे डास नसावेत, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. कारण डास हे एवढ्या उंचीवर उडत नाहीत आणि ते एकदम एवढ्या मोठ्या संख्येने एकत्र दिसून येत नाहीत, असे कीटकशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे.याबाबत महापालिकेच्या आरोग्य विभागाकडे विचारणा केली असता, कोणतेही समाधानकारक उत्तर मिळाले नाही. आरोग्य विभागाने ते डास नसावेत, असे सांगितले. प्रत्यक्षात ते कीटक नेमके कोणते होते, हे तपासण्यासाठी त्यांचे नमुने गोळा करण्याचे कामही आरोग्य विभागाने केले नाही. त्यामुळे ते कीटक कोणते हा प्रश्न अनुत्तरित आहे. हे कीटक नागरिकांच्या आरोग्यास धोकादायक आहेत की नाही, याचेही उत्तर महापालिकेकडे नाही. त्यामुळे महापालिका नागरिकांच्या आरोग्याबाबत किती गांभीर्याने विचार करते, ही बाब समोर आली आहे.नदीपात्रात कीटकांचे थवे दिसून आल्यानंतर सार्वजनिक आरोग्य विभागाचे सहायक संचालक डॉ. प्रतापसिंह सारणीकर यांनी महापालिकेला तातडीने कार्यवाहीच्या सूचना केल्या आहेत.

# पोलिसांकडून युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांची धरपकड

## भाजप कार्यालयाबाहेर आंदोलन करण्याचा डाव फसला

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्यातील वाढत्या गुन्हेगारीचा निषेध करण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या कार्यालया बाहेर आंदोलन करण्याच्या तयारीत असलेल्या युवक काँग्रेसच्या पदाधि काऱ्यांची पोलिसांनी सोमवारी धरपकड केली. या पदाधिकाऱ्यांना समज देऊन सायंकाळी सोडण्यात आले. राज्यातील वाढत्या गुन्हेगारीचा निषेध करण्यासाठी युवक काँग्रेसने दुचाकी फेरीची परवानगी पोलिसांकडे मागितली होती. पोलिसांनी परवानगीही दिली होती. मात्र दुचाकीवरून भाजप कार्यालयाकडे जाण्याचा आणि तेथे आंदोलन करण्याचा निर्णय पदाधिकाऱ्यांनी घेतला. त्याची माहिती पोलिसांना लागल्याने पोलिसांनी काँग्रेस भवनातच पदाधिकाऱ्यांना स्थानबद्ध केले आणि दुचाकी फेरीची परवानगीही पोलिसांनी ऐनवेळी नाकारली. त्यामुळे संतप्त झालेल्या पदाधिकाऱ्यांनी दुचाकीद्वारे बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्यांनी त्यांना ताब्यात घेतले. त्यामुळे काँग्रेस भवनात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.राज्य सरकार फक्त फोडाफोडीचे राजकारण करत आहे. राज्यातील प्रश्नांचे त्यांना काही देणेघेणे नाही. कायदा सुव्यवस्थेचा मोठा प्रश्न राज्यात निर्माण झाला आहे, असे युवक काँग्रेसचे राज्य प्रभारी उदयभानू चिब यांनी सांगितले. राज्यात वाढत असलेली गुन्हेगारी, पोलिसांवर दिवसाढवळ्या हात उगारणारे भाजपचे नेते, यांच्यावर सरकारचे नियंत्रण नाही, तलाठी भरती घोटाळा असेल किंवा वेगवेगळ्या भरतीतला घोटाळा असेल त्या बाबतीत सरकार पावले उचलण्यात अपयशी ठरल्याचा आरोप अक्षय जैन यांनी केला.पोलिसांनी चिब, जैन, सहप्रभारी एहसान खान, रोहन सुरवसे, तारीक बागवान, शहराध्यक्ष राहुल शिरसाट आणि प्रथमेश अबनावे यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांना ताब्यात घेत त्यांना समज दिली.




### दुचाकी फेरीची परवानगी

» राज्यातील वाढत्या गुन्हेगारीचा निषेध करण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या कार्यालया बाहेर आंदोलन करण्याच्या तयारीत असलेल्या युवक काँग्रेसच्या पदाधि काऱ्यांची पोलिसांनी सोमवारी धरपकड केली. या पदाधिकाऱ्यांना समज देऊन सायंकाळी सोडण्यात आले.राज्यातील वाढत्या गुन्हेगारीचा निषेध करण्यासाठी युवक काँग्रेसने दुचाकी फेरीची परवानगी पोलिसांकडे मागितली होती. पोलिसांनी परवानगीही दिली होती. मात्र दुचाकीवरून भाजप कार्यालयाकडे जाण्याचा आणि तेथे आंदोलन करण्याचा निर्णय पदाधिकाऱ्यांनी घेतला.

# राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयात हिंदुत्ववादी संघटनेचे आंदोलन

## 'आय एम नॉट द रिव्हर झेलम' चित्रपटाच्या प्रदर्शनास विरोध

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयात आयोजित करण्यात आलेल्या महोत्सवात 'आय एम नॉट द रिव्हर झेलम' या चित्रपटाच्या प्रदर्शनास हिंदुत्ववादी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी विरोध करून आंदोलन केले. आंदोलकांनी खेळ बंद पाडण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेच्या (एफटीआयआय) आवारात एका विद्यार्थी संघटनेने बाबरी मशीद पाडल्याच्या निषेधार्थ फलक लावल्याने आंदोलन करणाऱ्या संघटनेच्या कार्यकर्त्यांनी चित्रपट प्रदर्शनास विरोध करून आंदोलन केल्याची माहिती डेक्कन पोलिसांनी दिली.काश्मिरमधील हिंसाचारावर 'आय एम नॉट द रिव्हर झेलम' या चित्रपटाचे दिल्लीस्थित दिग्दर्शक प्रभाश चंद्रा यांनी केले आहे. रविवारी (११ फेब्रुवारी) राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयात चित्रपट प्रदर्शित केला जाणार होता. त्यानंतर दिग्दर्शक चंद्रा यांच्याशी संवाद साधण्यात येणार होता. काश्मिरमधील हिंसाचारावर आधारित असलेल्या या चित्रपटात भारतीय लष्करावर टीका करण्यात आल्याचा आरोप करून समस्त हिंदू बांधव संघटनेचे ३० ते ३५ कार्यकर्ते राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाच्या आवारात आले. त्यांनी चित्रपटाच्या प्रदर्शनास विरोध करून घोषणाबाजी केली. या घटनेची माहिती पोलिसांना दिली असल्याचे संयोजकांनी सांगितले.




चित्रपटाचे प्रदर्शन पार पडले, त्यानंतर दिग्दर्शक चंद्रा यांनी प्रेक्षकांशी संवाद साधला. याप्रकरणाची चौकशी सुरू असून, अद्याप गुन्हा दाखल करण्यात आला नसल्याची माहिती पोलिसांनी दिली.एफटीआय आय'च्या आवारात 'रिमेंबर बाबरी डेथ ऑफ कॉन्स्टिट्यूशन' अशा आशयाचे फलक लावण्यात आल्याने तणाव निर्माण झाला. आवारातील फलक फाडून सुरक्षारक्षकाला मारहाण केल्याप्रकरणी समस्त हिंदू बांधव संघटनेच्या कार्यकर्त्यांविरुद्ध डेक्कन पोलीस ठाण्यात नुकताच गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर ३ फेब्रुवारी रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्रात विद्यार्थ्यांकडून रामायणातील व्यक्तिरेखा असलेले नाटक अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांनी बंद पाडले. नाटकातील संवादातून भावना दुखावल्याच्या आरोपावरून ललित कला केंद्राचे विभागप्रमुख प्रवीण भोळे यांच्यासह सहा जणांना चतु:शृंगी पोलिसांनी अटक केली होती. ललित कला केंद्राच्या आवारात तोडफोड प्रकरणी भारतीय जनता पक्ष युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन करून तोडफोड केली होती.